जनसंपर्क कक्ष
1 9 MAY 2022 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'पंगतीतलं पान'मधून जातव्यवस्था आणि अर्थकारणाच्या गुंत्यावर भाष्य


## डॉ. अविनाश कोल्हे; मराठी विभागात मुक्तसंवाद

सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता.१८ : 'पंगतीतलं पान या कादंबरीत ग्रामीण भागातील जातीव्यवस्था आणि अर्थकारणाचा गुंता, या विषयावर भाष्य करण्यात आले आहे. त्यामुळे ही कादंबरी अनेक अर्थांनी महत्त्वाची आहे,' असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. अविनाश कोल्हे यांनी व्यक्त केले. कादंबरी या विषयावर त्यांनी विद्यार्थ्यांशी मुक्तसंवाद साधला.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागाने आयोजन केले होते.



**कोल्हापूर : मराठी विभागात विद्यार्थ्यांशी मुक्तसंवाद साधताना डॉ. अविनाश कोल्हे.**

यामध्ये हिंदू आणि पंगतीतलं पान या कादंबऱ्यांवर भाष्य केले. डॉ. कोल्हे म्हणाले, 'मराठी साहित्यामध्ये कादंबरी हा साहित्यप्रकार महत्त्वाचा आहे. या कादंबऱ्यांमधून मोठ्या प्रमाणात सामाजिक परिस्थिती, नात्यातील संघर्ष, समाजउतरंड, ग्रामीण जीवन पाहायला मिळते. त्यातील वेदना, दुःख वाचकांना कळते. 'पंगतीतलं पान' ही कादंबरी गावातील जातीव्यवस्था आणि अर्थकारण तसेच माणसामाणसांतील नातेसंबंधाचा गुंता उलगडून दाखवण्याचा प्रयत्न करणारी कादंबरी आहे.' याप्रसंगी त्यांनी कादंबरी लेखन या विषयावर विद्यार्थ्यांशी मुक्तसंवाद साधला. प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत व प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन सुस्मिता खुटाळे यांनी केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

19 MAY 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## 'पुढारी'कार डॉ. ग. गो. जाधव व्याख्यानमाला


# केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांचे उद्या व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने आयोजित केलेल्या 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमालेत भारत सरकारचे केंद्रीय माहिती आयुक्त उदय माहूरकर यांचे शुक्रवारी (दि.२०) सायंकाळी ५ वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक येथे व्याख्यान होणार आहे. 'भारत एक जागतिक महासत्ता' या विषयावर ते पुष्प गुंफणार आहेत. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थान भूषविणार असून, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित असणार आहेत. या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाने केले आहे.

उदय माहूरकर हे सध्या केंद्रीय माहिती आयुक्त म्हणून नवी दिल्लीत काम पाहत आहेत. केंद्रीय माहिती अधिकार न्यायालयाचे ते न्यायमूर्ती आहेत. केंद्रीय माहिती आयोग असे त्याला म्हटले जाते. विशेष म्हणजे माहूरकर हे प्रख्यात लेखकही आहेत. केंद्रीय माहिती आयुक्तपदावर येण्यापूर्वी गेली ३३ वर्षे त्यांनी 'इंडिया टुडे' या नामांकित मासिकाचे राजकीय विश्लेषक म्हणून विशेष भूमिका बजावली आहे.

राजकीय विश्लेषक या नात्याने २००८ ते २०१० या कालावधीत 'इंडिया टुडे'मध्ये लिखाण करीत असताना त्यांनी स्वतःचा वाचकवर्ग निर्माण केला. अचूक राजकीय विश्लेषक असा त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो. त्यांनीच



पंतप्रधानपदी नरेंद्र मोदी येणार, असे विश्लेषण केले होते आणि ते अचूकही ठरले.

माहूरकर यांची तीन पुस्तके देशभर आणि परदेशातही वाचकांच्या लौकिकास पात्र ठरली आहेत. यामध्ये दोन पुस्तके पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर असून, 'मोदींचे प्रशासनाचे मॉडेल' हे पुस्तक प्रसिद्ध आहे. नरेंद्र मोदी यांच्या प्रशासनाचे गमक जाणून घेण्यासाठी हे पुस्तक सर्वत्र प्रसिद्ध आहे.

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्यावरील त्यांचे प्रसिद्ध झालेले पुस्तक सर्वत्र चर्चेचा विषय ठरले. या पुस्तकात त्यांनी सावरकरांविषयी एका वेगळ्या पैलूवर प्रकाशझोत टाकला आहे. 'भारताची फाळणी रोखणे आणि राष्ट्रीय सुरक्षा दृष्टिकोन' या विषयावर या पुस्तकात भर देण्यात आला आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही या पुस्तकाचा मुक्तकंठाने गौरव केला आहे.

पहिल्या फाळणीपासून धडा घेऊन दुसरी फाळणी रोखण्यासाठीचे मार्गदर्शन करणारे त्यांचे पुस्तक प्रसिद्ध आहे. याच पुस्तकात त्यांनी सावरकर यांचा 'भारतीय राष्ट्रीय सुरक्षेचे पितामह' म्हणून गौरवपूर्ण उल्लेख केला आहे.

'सावरकर यांची राष्ट्रीय सुरक्षेची दूरदृष्टी आणि मोदी मॉडेल' यासह अन्य विषयांवर राजकीय विश्लेषक म्हणून माहूरकर यांचा लौकिक आहे. 'भारतातील पुरोगामी मुस्लिम संघटनांची वाटचाल' आणि 'साऊथ एशिया अँड डिस्टॉर्टिऑन्स इन इंडियन हिस्ट्री' ही पुस्तके चर्चेत आहेत.

२०१४ साली प्रसिद्ध झालेल्या 'सेंटरस्टेज इनसाईड द नरेंद्र मोदी मॉडेल ऑफ गव्हर्नन्स' या नवी दिल्लीत प्रकाशित झालेल्या पुस्तकाने संपूर्ण देशाचे लक्ष त्यांनी वेधून घेतले. नरेंद्र मोदी यांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारे हे पहिले पुस्तक प्रकाशित झाले.

ख्यातनाम अर्थतज्ज्ञ डॉ. जगदीश भगवती, प्रसिद्ध पत्रकार स्वपनदास गुप्ता यांनीही 'सेंटरस्टेज' या पुस्तकाचा गौरव केला आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रणेते श्री. श्री. रविशंकर तसेच ख्यातनाम अर्थतज्ज्ञ बिबेक दिब्रॉय आणि जालंदरचे महाराजा हिज हायनेस गजसिंग यांनीही या पुस्तकाचा गौरव केला आहे.

'मार्चिंग विथ अ बिलियर' या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पंतप्रधानपदाच्या तीन वर्षांच्या कारकिर्दीचा आढावा घेणारे पुस्तक २०१७ साली राष्ट्रपती भवनात प्रकाशित करण्यात आले. तत्कालीन अर्थमंत्री अरुण जेटली यांच्या प्रमुख उपस्थितीत तत्कालीन राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी त्याचे प्रकाशन केले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमचे संस्थापक व ॲन्युयल डाओस बिझनेस मिट इन स्वीत्झर्लंडचे संघटक प्रोफेसर क्लॉस श्वॉब यांनी या पुस्तकाचा विशेष उल्लेख केला आहे. फ्रान्सचे तत्कालीन अध्यक्ष फ्रँकोईस होलँडे, बांगलादेशच्या पंतप्रधान शेख हसीना आणि इन्फोसिसचे संस्थापक नारायण मूर्ती यांच्या उपस्थितीत या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

### सतरा वर्षांत सर्वाधिक प्रकरणे निकालात काढण्याचा राष्ट्रीय उच्चांक करणारे माहूरकर

उदय माहूरकर यांनी केंद्रीय आयुक्तपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर प्रलंबित असणारी प्रकरणे निकालात काढण्याचा राष्ट्रीय उच्चांक प्रस्थापित केला आहे. गेल्या १७ वर्षांच्या कालावधीत एका वर्षात एवढी प्रकरणे निकालात काढण्याचा हा उच्चांक आहे. २०२१-२२ या सालात त्यांनी ५ हजार ५६ प्रकरणे निकालात काढली. यामध्ये त्यांनी दिलेले काही निर्णय हे विशेष महत्त्वाचे आहेत. यामध्ये सर्वात महत्त्वाचे म्हणजे राष्ट्रीय हस्तलिखित आयोगाला २ लाख ७३ हजार हस्तलिखित दस्तावेज सार्वजनिक करण्याचा दिलेला आदेश गाजला आहे.

19 MAY 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वस्तुसंग्रहालये नवनिर्मितीची प्रेरणा देतात

## युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती; ऑनलाईन व्याख्यानमालेचे उद्‌घाटन

कोल्हापूर, ता. १८ : ''वस्तुसंग्रहालये इतिहासाचा एक पट उलगडतात, जीवनमूल्ये उलगडून दाखवतात. येथील वस्तू आपल्याला नवनिर्मितीची प्रेरणा देतात,'' असे युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती यांनी सांगितले. जागतिक वस्तुसंग्रहालय दिनानिमित्त ऑनलाईन व्याख्यानमाला आणि ऑफलाईन चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन संयोगिताराजे यांच्या हस्ते झाले. वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालय आणि पुरातत्त्व व वस्तुसंग्रहालय संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.



**कोल्हापूर : संग्रहालय दिनाच्या समारंभात बुधवारी (ता.११) युवराज्ञी संयोगिताराजे छत्रपती यांचे स्वागत व्ही. एन. शिंदे यांनी ययाती कादंबरी देऊन केले. शेजारी डॉ. रणधीर शिंदे, डॉ. निलांबरी जगताप.**

अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे होते. वि. स. खांडेकर स्मृती संग्रहालयाच्या संचालक डॉ. नीलांबरी जगताप यांनी प्रास्ताविक केले. संयोगिताराजे म्हणाल्या, ''वस्तुसंग्रहालये ही आजच्या काळासाठीही प्रेरणादायी आहेत. प्रांतिक इतिहास हे जीवनमूल्ये उलगडून दाखविण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. जीवन समृद्ध करण्यासाठी ही वस्तुसंग्रहालये महत्त्वपूर्ण असतात. वस्तुसंग्रहालयांतून प्रत्येक व्यक्तीला काही ना काही घेण्यासारखे असते. माणसाची सृजनशीलता जागृत राहावयाची असेल तर माणसाला प्रश्न पडले पाहिजे. त्या प्रश्नांची जागृतता वस्तुसंग्रहालयांतून मिळते. विविध विषयांना वाहिलेली आज संग्रहालये पाहावयास मिळतात.''

### कार्यक्रम असे

- **गुरुवार (ता.१९)** - 'लग्न पाहावे करून' हा चित्रपट
- **शुक्रवार (ता. २०)** - 'माणसाला पंख असतात' या चित्रपटाचे प्रक्षेपण. डॉ. अश्विनीकुमार राठोड यांचे 'ब्रिटिश अर्थनीती व वस्तुसंग्रहालय' विषयावर व्याख्यान
- **शनिवार (ता. २१)** - डॉ. तेजस गर्गे यांचे संग्रहालयांची सांस्कृतिक शक्ती, या विषयावर व्याख्यान (ही सर्व व्याख्याने ऑनलाईन असतील)